**प्रेस नोट दिनांक ३१/०१/२०२५**

## शहर गुन्हे शखेकडुन, मोटार सायकल चोरीचे ०८ व इतर चोरीचा ०१ असे ०९ गुन्हे घडकीस.

अ) दिनांक ०४/०१/२०२५ ते दिनांक २३/०१/२०२५ चे कालावधीत, गुन्हे शाखेकडील पो.उप.नि./अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार असे, सोलापूर शहर परिसरात सतर्कतेने पेट्रोलिंग करत असताना, त्यांना प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीचे आधारे, **१) आरोपी नामे-आय्यप्पा माळप्पा पारट २) विशाल शेटीबा देवकर ३) नागेश भीमाशंकर पाटील ४) चंद्रशेखर संगप्पा गुब्याडकर ५) ऋतीक उर्फ डेविल शंकर गायकवाड ६) उमेश नागनाथ भोसले, असे एकूण ०६ आरोपी आणि ०१ विधिसंघर्षग्रस्त बालक,** सर्व राहणार सोलापूर यांना ताब्यात घेवुन, नमूद पथकाने त्यांचेकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, सोलापूर शहर पोलीस ठाणे हद्दीतील चोरीस गेलेल्या, मोटार सायकल चोरीचे, खालील प्रमाणे एकुण ०८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | जप्त मुद्देमाल | किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | जोडभावी पेठ | 5/2025 भादंवि कलम 379 | युनिकॉर्न मो.सा.क्र.MH 45 U 5010 | 35,000/- |
| 2 | जेलरोड | 4/2025 भा.न्या.सं.क 303(2) | ॲक्सीस मो.सा.क्र.MH 13 EA 6029 | 75,000/- |
| 3 | जोडभावी पेठ | 15/2025 भा.न्या.सं.क 303(2) | पॅशन मो.सा.क्र.MH 13 CM 1204 | 25,000/- |
| 4 | सदर बझार | 24/2025 भा.न्या.सं.क 303(2) | HF Delux मो.सा.क्र. MH 13 BT 5213 | 20,000/- |
| 5 | जेलरोड | 329/2019 भादंविक 379 | HF Delux मो.सा.क्र. MH 13 BU 6018 | 25,000/- |
| 6 | सदर बझार | 56/2025 भा.न्या.सं.क 303(2) | पल्सर 220 मो.सा.क्र. MH12 LG 2892 | 70,000/- |
| 7 | सदर बझार | 59/2025 भा.न्या.सं.क 303(2) | ॲक्टीव्हा मो.सा.क्र. MH 13 AT 8173 | 40,000/- |
| 8 | सदर बझार | 60/2025 भा.न्या.सं.का 303(2) | ॲक्टीव्हा मो.सा.क्र. MH 13 CL 5632 | 25,000/- |
| | | | **एकूण** | **03,15,000/-** |

ब) **त्याचप्रमाणे,** दि.१८/०१/२०२५ रोजी, गुन्हे शाखेकडील पोउपनि/अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकास मिळालेल्या गोपनिय बातमीचे आधारे, **इसम नामे - व्यंकटेश विरमोहन आरकाल,** वय ४० वर्षे, रा. घर नं. २१७, गिरी झोपडपट्टी दत्त नगर, सोलापूर यास ताब्यात घेवुन, त्याच्याकडे चोरीचे संबधाने, चौकशी केली असता, त्याने दि. ११/०१/२०२५ रोजी, बालाजी मंदीर, सोलापूर जनता बँकेच्या शेजारी, दत्त नगर, सोलापूर येथुन एक सोन्याचे ब्रेसलेट सुमारे ०३ तोळे वजानाचे अप्रामाणिकपणे घेवुन गेल्याची कबुली दिल्याने, त्याचे ताब्यातुन, **सोन्याचे ०३ तोळयाचे ब्रेसलेट किं.अं. १,९४,०००/- रुपये जप्त करुन, जेलरोड पोलीस ठाणे येथील गु.र.नं.१६/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये,** दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.

अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेकडील पो.उप.नि./अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी, **मोटार सायकल चोरीचे ०८ व इतर चोरीचा ०१ असे ०९ गुन्हे उघडकीस आणून, एकुण ५,०९,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदरची कामगिरी, श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उप-निरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार- बापू साठे, राहुल तोगे, वसीम शेख, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, चापोशि- सतिश काटे, बाळासाहेब काळे, सायबर पोलीस ठाणे कडील- प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करिता.**